देशोन्नती दि. १८/०८/१९

# देशी कट्ट्यासह अट्टल गुन्हेगारास अटक

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



*प्रतिनिधी / १७ ऑगस्ट*

**चंद्रपूर :** चंद्रपूर गुन्हे शाखेच्या पथकाला माहिती मिळाली की, वित्तुबाबा मंदिर जवळ जुनोना चौक चंद्रपुर येथे राहणारा अटटल गुन्हेगार सोनु टाक हा त्याचे जवळ गावठी बनावटीचे पिस्टल बाळगूण जुनोना चौक परिसरात फिरत आहे. अशी माहिती मिळताच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने रात्री दरम्यान जुनोना चौक येथे परिसरात मिळालेल्या माहितीप्रमाणे सोनुसींग जितसिंग टाक (२५) रा. वित्तुबाबा मंदिर जवळ जुनोना चौक यास ताब्यात घेवुन त्याची झडती घेतली तर त्याचे जवळ एक गावठी बनावटीचे पिस्टल ज्यामध्ये दोन जिवंत काडतुस तसेच एक लोखंडी धारदार सुरा व नगदी रोख रूपये २७.२०० रूपये असा एकुण ४७.९०० रूपयाचा माल मिळुन आला. पोलिसांनी सोनु टाक यास ताब्यात घेवुन रामनगर पोलिस स्टेशन येथे अपराध क्र. १०२७ / २०१९ कलम ३, २५ भारतीय हत्यार कायदयान्वये गुन्हा नोंद केला आहे. सोनु टाक याचेविरूध्द विविध पोलीस स्टेशनमध्ये गंभीर गुन्हयाची नोंद आहे. सदर प्रकरणाचा पुढील तपास रामनगर अधिक्षक चंद्रपुर यांचे मार्गदर्शनामध्ये पोलिस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, पो.उप. नि.नागेश आर. जायले, पो.उप. नि प्रविण मानकर,पो.हवा. राजेद्र खनके, कैलाश खोब्रागडे, ना.पो.शि. मिलींद चव्हाण, जमीर खान, गजानन नागरे, अदिनाश दशमवार, अमजद खान, मनोज रामटेके, नईम, खान, पो.शि. प्रफुल, मयुर येरणे, चापोशि प्रितम रामटेके यांनी केली आहे.